आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

४ नोव्हेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली, सुमारे ३ हजार उमेदवारांनी माघार घेतल्यानं ४ हजारांहून अधिक उमेदवार रिंगणात

- गोपाळ शेट्टी, उदय बने, रमेश कदम रिंगणाबाहेर; सदा सरवणकर, समीर भुजबळ, निर्मला गावित यांची बंडखोरी कायम

- उत्तराखंडमध्ये बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात ३६ जणांचा मृत्यू, १९ जण जखमी

- अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदासाठी उद्या मतदान

**आणि**

- FTII च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ‘Sunflowers Were the First Ones to Know’ हा लघुपटाला ऑस्कर पुरस्कारांच्या लाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म प्रकारात नामांकन

**<><><><><>**

राज्यात २० नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी चित्र आज स्पष्ट झालं. यंदा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात सुमारे ४ हजार १०० उमेदवार रिंगणात आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी

सुमारे ३ हजार उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असले तरी बंडखोरी पूर्णपणे शमलेली नाही. गेल्या विधानसभा निवडणूक ३ हजार २७५ उमेदवार रिंगणात होते.

जागावाटपाबद्दल शेतकरी कामगार पक्षाशी चर्चा झाली असून उरणची जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष लढवेल, तर अ**लिबाग, पेण आणि पनवेलमधून** शेकापचे उमेदवार निवडणुकीत उतरतील, अशी माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली.

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. मित्रपक्षांनी उमेदवारांची यादी पाठवली नसल्यामुळे माघार घेत असल्याचं, त्यांनी सांगितलं.

**कोल्हापूर** उत्तर मतदारसंघात कॉँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमा राजे यांनी अखेरच्या क्षणी अर्ज मागं घेतला. राजेश लाटकर यांची उमेदवारी रद्द करुन कॉँग्रेसनं त्यांना उमेदवारी दिली होती. मात्र लाटकर माघार घ्यायला तयार झाले नसल्यानं शेवटच्या १० मिनिटात मधुरिमाराजे यांनीच अर्ज मागे घेतला.

माघार घेणाऱ्या प्रमुख उमेदवारांमध्ये भाजपाचे माजी खासदार गोपाळ शेट्टी, **रत्नागिरी** विधानसभा मतदारसंघातले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उदय बने, मोहोळमधले राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सिद्धी कदम आणि रमेश कदम यांची नावं आहे.

**नाशिक** जिल्ह्यातून कॉँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या डॉ. हेमलता पाटील, तसंच राष्ट्रवादी कॉँग्रेसचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, भाजपाचे बंडखोर नेते शशिकांत जाधव आणि दिलीप भोसले, शिवसेनेचे धनराज महाले यांनी अर्ज आज मागे घेतले. **नागपूर** ग्रामीणच्या उमरेड मतदारसंघातून माजी आमदार राजू पारवे यांनी आपला अर्ज मागे घेतला.

**माहिम** विधानसभा मतदार संघात मनसेचे अमित ठाकरे यांना महायुतीचा पाठिंबा देण्याची भूमिका भाजपानं घेतली होती. मात्र तिथून शिवसेनेचे सदा सरवणकर निवडणूक रिंगणात कायम आहेत.

**नाशिक** जिल्ह्यात समीर भुजबळ, निर्मला गावित यांची उमेदवारी कायम आहे. **राजापूरमधून** काँग्रेसच्या अविनाश लाड यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे.

**<><><><><>**

राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगानं दिले आहेत. काँग्रेस आणि इतर पक्षांच्या तक्रारीनंतर आयोगानं ही कारवाई केली आहे. नवीन महासंचालकांच्या नियुक्तीसाठी तीन वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची नावं पाठवण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं राज्याच्या मुख्य सचिवांना दिले आहेत. या पदासाठी मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, पोलीस सेवेतले वरिष्ठ अधिकारी संजय वर्मा आणि रितेश कुमार या तिघांच्या नावांची चर्चा आहे. सध्या विवेक फणसळकर यांच्याकडे कार्यभार सोपवला आहे.

निवडणूक आयोगाच्या या आदेशाचं काँग्रेसनं स्वागत केलं आहे. पण रश्मी शुक्ला यांना हटवण्यास एवढा उशिर का लागला? असा प्रश्न काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. आता रश्मी शुक्ला यांना निवडणुकीच्या संदर्भातलं कोणतंही काम देऊ नये, असं त्यांनी म्हटलंय.

रश्मी शुक्ला यांच्या बदलीचा निर्णय अतिशय योग्य असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली आहे.  रश्मी शुक्ला यांच्या कार्यकाळाला मुदतवाढ देण्यावरून नाना पटोले यांनी देवेंद्र

फडनवीस यांच्यावर बेछूट आरोप केले. मात्र, त्यांना त्याचे पुरावे द्यावे लागतील. पुरावे नसतील तर पटोले यांच्या विरुद्ध आम्ही निवडणूक आयोगाकडे तक्रार करू, असं भाजपाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष आशीष शेलार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या वर्धा आणि नागपूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

हेमंत सोरेन सरकारनं झारखंड मधल्या लोकांची फसवणूक केली असल्याची टीका प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज झारखंड मधल्या गढवा इथं केली. ते झारखंड विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान जनसभेला संबोधित करताना बोलत होते.

**<><><><><>**

केरळ, पंजाब आणि उत्तरप्रदेशातल्या १४ विधानसभा मतदारसंघामधल्या पोटनिवडणुकांसाठी मतदानाची तारीख केंद्रीय निवडणूक आयोगाने बदलली आहे. पलक्कड, डेरा बाबा नानक, चब्बेवाल,गिद्देरबाहा, बर्नाला, मीरपूर, कुंदर्की, गाझियाबाद, खैर,कऱ्हाल, सिशामाऊ, फुलपूर, कटेहारी आणि मझवा या मतदारसंघांमधे १३ नोव्हेंबरला मतदान होणार होतं, ते आता २० नोव्हेंबरला होणार आहे. १३ नोव्हेंबरच्या आसपास अनेक धार्मिक उत्सव असल्यानं

मतदानाची तारीख बदलण्याची विनंती अनेक राजकीय पक्ष तसंच सामाजिक संस्था संघटनांनी केला होती. मतमोजणी २३ नोव्हेंबरला होईल.

**<><><><><>**

मध्य प्रदेशाच्या उमरिया जिल्ह्यातल्या बांधवगड व्याघ्र राखीव परिक्षेत्रात नुकत्याच झालेल्या १० हत्तीच्या मृत्यू प्रकरणी राज्य सरकारनं क्षेत्र संचालकांसह अन्य एका अधिकाऱ्याला निलंबित केलं आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमधल्या अल्मोडा जिल्ह्यात आज एक बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात ३६ जणांचा मृत्यू झाला तर १९ जण जखमी झाले आहेत. या बसमध्ये ५५ प्रवासी होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अपघाताविषयी तीव्र शोक व्यक्त केला आहे. अपघातातल्या मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री साहाय्यता निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांचं अर्थसाहाय्य मिळणार आहे. मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख तर जखमींना १ लाख रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणाही धामी यांनी केली आहे.

**<><><><><>**

अमेरिकेच्या ४७ व्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. टपाली मतदानाने अनेकांनी आपलं मत आधीच नोंदवलं आहे. या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रेटिक पक्षाच्या नेत्या कमला हॅरिस यांच्यात ही लढत होईल. या दोघांनीही निवडणुकीत निर्णायक ठरणाऱ्या राज्यांमध्ये जोरदार प्रचार केला आहे. निवडणूक जिंकण्यासाठी उमेदवाराला २७० इलेक्टोरल कॉलेज मतांची आवश्यकता असते. ॲरिझोना,

नेव्हाडा, विस्कॉन्सिन, मिशिगन, पेनसिल्विनिया, नॉर्थ कॅरोलिना आणि जॉर्जिया या राज्यांमधल्या निकालांनंतरच चित्र स्पष्ट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**<><><><><>**

अमेरिकी अध्यक्ष पदाची निवडणूक आणि फेडरल रिझर्व्हच्या पतधोरण आढावा समितीची बैठक या दोन कारणांमुळं देशातल्या शेअर बाजारात आज मोठी घसरण झाली. दिवसअखेर सेन्सेक्स ९४२ अंकांनी घसरुन ७८ हजार ७८२ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३०९ अंकांनी घसरुन २३ हजार ९९५ अंकांवर बंद झाला. जवळपास सर्वच क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागात घसरण दिसून आली.

**<><><><><>**

कॅनडातमध्ये  काल ओंटारियो इथं  ब्रॅम्प्टनमधल्या  हिंदू सभा मंदिरात अतिरेकी आणि फुटीरतावाद्यांनी केलेल्या हिंसाचाराचा भारताने निषेध केला आहे. कॅनडामधल्या  भारतीय नागरिकांच्या सुरक्षेबाबत भारताने  तीव्र चिंता व्यक्त केली आहे. सर्व प्रार्थनास्थळे अशा हल्ल्यांपासून सुरक्षित राहतील, हिंसाचार करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, अशी भारताची अपेक्षा आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी कॅनडा सरकारला दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.  **दरम्यान**  व्हँकुव्हर आणि सरे इथंही  2 आणि 3 नोव्हेंबर ला अशाच प्रकारच्या सभांमध्ये  असाच हिंसाचार झाला होता.

**<><><><><>**

पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ‘Sunflowers Were the First Ones to Know’ या लघुचित्रपटाला प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्कारांच्या लाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म या प्रकारात नामांकन

मिळालं आहे. चिदानंद एस. नाईक यांचं दिग्दर्शन असलेल्या या चित्रपटानं यंदाच्या कान चित्रपट महोत्सवात ला सिनेफ विभागात प्रथम पुरस्कार पटकावला होता.

**//<><><><><>//**